## प्रकरण पाचवे

## आर्थिक प्रगती

दक्षिण महाराष्ट्रातील औंध सारख्या छोटेखानी संस्थानच्या आर्थिक प्रगतीचा आलेख रेखाटत असताना त्याने विसाव्या शतकात शेती व इतर पूरक व्यवसाय उद्योग धंदे, व्यापार इत्यादी क्षेत्रात काय प्रगती केली याचा आणि संस्थानच्या एकूण सरासरी उत्पन्नात झालेली वाढ या गोष्टींचा विचार करावा लागतो. विसाव्या शतकाच्या प्रारंभी संस्थानातील आर्थिक परिस्थिती कशी होती ? त्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी संस्थानच्या राज्यकर्त्यांनी विशेषत: बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी कोणकोणते उपाय योजले ? संस्थानाचे विलीनीकरण होण्याच्या सुमारास त्याची आर्थिक परिस्थिती कशी होती ? इत्यादी महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

अ) शेती विकास -

औंध संस्थानातील बहुतेक लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच होता. संस्थानातील ८० टक्के लोक शेतीवर उपजिविका करणारे होते. त्यामुळे शेती हेच संस्थानच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. इतरही अनेक मार्गांनी संस्थानला कमी जास्त प्रमाणात उत्पन्न मिळत होते. परंतु शेतीच्या उत्पन्नावरच संस्थानच्या तिजोरीचे भवितव्य अवलंबून होते. बाळासाहेब पंतप्रतिनिधी सत्तेवर येण्यापूर्वी औंध संस्थानात शेती ही पारंपारिक पध्दतीनेच केली जात होती. शेतीच्या बाबतीत आधुनिक तंत्राचा वापर केला जात नव्हता. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढू शकत नव्हते. दुसरी गोष्ट औंध संस्थानात पावसाचे प्रमाण फारच कमी होते. संस्थानातील कोणत्याही तालुक्यात पावसाचे प्रमाण समाधानकारक नव्हते असे दिसून येते. नद्यांच्या काठची काही गावे सोडली तर इतर ठिकाणच्या लोकांना नेहमीच कठीण आर्थिक परिस्थितीतस तोंड द्यावे लागत होते. बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकडे प्रामुख्याने लक्ष पुरविले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक प्रकारांनी शेतीचे व त्यायोगे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला.

पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न :

सन १९०९ मध्ये बाळासाहेब पंतप्रतिनिधी सत्तेवर आले त्यावेळी संस्थानातील लागणीलायक जमिनीचे क्षेत्र २,९३,३७७ एकर इतके होते. त्यापैकी पडीक जमिनीचे क्षेत्र ६,४२० एकर १० गुंठे इतके होते. त्यानंतरच्या काळात बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी लोकांनी अधिक जमीन लागवडीखाली आणावी व आपले उत्पन्न वाढवावे यासाठी लोकांना या पडीक जमिनीपैकी प्रत्येक वर्षी थोडी थोडी जमीन कसण्यासाठी दिली. त्याचप्रमाणे प्रत्येक वर्षी कस वाढविण्यासाठी काही जमीन पडीक टाकून शेतीचे उत्पन्न वाढविण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. याप्रमाणे सन १९०८-९ मध्ये पडकी जमिनीचे एकूण क्षेत्र ६,३४३ एकर ६ गुंठे इतके होते. सन १९०९-१० मध्ये पडीक जमिनीपैकी ४११ एकर ३० गुंठे जमीन लागणीखाली आणली व ४८८ एकर २१ गुंठे जमीन पडीक टाकली. सन १९२०-२१ मध्ये एकूण पडीक जमिनीचे क्षेत्र २,०९६ एकर १४ गुंठे होते. सन १९२१-२२ मध्ये पडीक जमिनीपैकी फक्त २६ गुंठे जमीन लागणीखाली आणली व ६४ एकर १७ गुंठे जमीन पडीक टाकली. सन १९२८-२९ मध्ये पडीक जमिनीचे एकूण क्षेत्र १,९४२ एकर ३५ गुंठे होते. सन १९२९-३० मध्ये पडीक जमिनीपैकी ६८ एकर ७ गुंठे जमीन लागणीखाली आणली व १७ एकर ३६ गुंठे जमीन पडीक टाकली. सन १९३९-४० मध्ये पडीक जमिनीपैकी १८ एकर १८ गुंठे जमीन लागणीखाली आणली तर ५१ एकर ३३ गुंठे जमीन पडीक टाकली. सन १९४२-४३ मध्ये पडीक जमिनीचे एकूण क्षेत्र २,८३५ एकर ३० गुंठे होते. सन १९४३-४४ मध्ये पडीक जमिनीपैकी ४८० एकर १७ गुंठे जमीन पडीक टाकली. अशाप्रकारे बाळासाहेबांनी सन १९३५ पर्यन्त म्हणजे २५ वर्षात जवळजवळ ४,४०० एकर पडीक जमीन लागणीखाली आणली. सन १९३५ मध्ये पडीक जमिनीचे एकूण

क्षेत्र २,०५७ एकर इतके होते. याचे कारण प्रत्येक वर्षी काही जमीन कस वाढविण्यासाठी पडीक टाकली जात होती हे आहे.[१]

यापमाणे बाळासाहेबांनी आपल्या कारकिर्दित संस्थानातील पडीक जमिनी लागवडीखाली आणून लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र वाढविण्याचा आणि काही जमीन पडीक टाकून जमिनीचा कस वाढविण्याचाही प्रयत्न केलेला दिसून येतो.

## फॉरेस्ट जमिनी लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न :

सन १९०९ मध्ये बाळासाहेब सत्तेवर आले त्यावेळी संस्थानात फॉरेस्ट जमिनीचे एकूण क्षेत्र ४,७६० एकर इतके होते. परंतु बाळासाहेबांनी आपल्या कारकिर्दित या फॉरेस्ट जमिनीपैकी शक्य तेवढी जमीन लोकांना कसण्यासाठी देऊन संस्थानातील शेतीच्या विकासास हातभार लावण्याचा व शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात भर घालण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्यांच्या कारकिर्दित संस्थानातील फॉरेस्ट जमिनीचे क्षेत्र कमी होत गेलेले दिसून येते. सन १९२१-२२ मध्ये संस्थानातील फॉरेस्ट जमिनीचे एकूण क्षेत्र ३,२४८ एकर इतके होते. सन १९३५ मध्ये मात्र हेच क्षेत्र ३,०५८ एकर इतके होते. म्हणजे बाळासाहेबांनी आपल्या कारकिर्दिच्या पहिल्या २५ वर्षात जवळजवळ १,७०२ एकर फॉरेस्ट जमीन लागणीखाली आणून संस्थानच्या उत्पन्नात भर घातली असे दिसून येते. सन १९४३-४४ मध्ये संस्थानात लागणी लायक जमिनीचे एकूण क्षेत्र २,८४,६६७ एकर ३० गुंठे होते. त्यापैकी प्रत्यक्ष लागणीखाली २,८१,७०५ एकर ३ गुंठे एवढे क्षेत्र होते. तर सन १९४५-४६ मध्ये संस्थानात शेती योग्य जमीन २,७९,४४९ एकर होती. त्यापैकी २,०१,३५५ एकर जिराईत व १४,९६९ एकर बागाईत होते.[२]

शेती सुधारणेसंबंधी विविध योजना :

संस्थानातील शेती व्यवसायाच्या बाबतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा, सुधारित पध्दतीचा अवलंब केल्याशिवाय शेतीच्या उत्पन्नात वाढ होणार नाही याची बाळासाहेबांना जाणीव होती. यासाठी त्यांनी सन १९०९-१० मध्येच संस्थानातील शेतकऱ्यांना सुधारित शेती पध्दतीचे ज्ञान व्हावे, आहे या परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी शेती व्यवसायात कोणत्या सुधारणा, घडवून आणाव्यात यासंबंधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना लाभावे अशी व्यवस्था केली. त्यासाठी त्यांनी पुणे शेतकी कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर एच. एच. मॅन व त्याच कॉलेजचे प्रोफेसर जे.बी. नाईट या शेतकी तज्ज्ञांना शेती सुधारण्यासंबंधी शेतकऱ्यांना प्रयोग दाखविण्यासाठी औंध येथे बोलावून घेतले. त्याचा योग्य तो परिणाम दिसून आला. या वर्षापासूनच औंध संस्थानातील लोक मशागतीसाठी लाकडा ऐवजी लोखंडी नांगराचा उपयोग करू लागले. त्याचप्रमाणे विहिरीतून पाणी काढण्यास पूर्वी कातडी मोटांचा उपयोग केला जात होता. तो बंद होऊन लोक त्याऐवजी लोखंडी मोटांचा वापर करू लागले. यावरून आपणास असे दिसून येते की बाळासाहेबांच्या कारकिर्दिच्या सुरुवातीपासूनच शेती सुधारणेला प्रारंभ झालेला होता.[3]

बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी संस्थानातील शेती सुधारणेसंबंधी विविध योजनांची अंमलबजावणी केलेली दिसून येते. सन १९१७-१८ मध्ये संस्थानातील कुंडल तालुक्यातील जमिनीची पाहणी करून शेती सुधारणेसंबंधी उपयुक्त माहिती गोळा करण्यासाठी श्री. शिवराम गोविंद दर्शने बी.एजी. यांची ॲग्रिकल्चरल सर्वेअर म्हणून नेमणूक केली. त्यांनी आपल्या दहा महिन्यांच्या कालावधीत कुंडल तालुक्यातील १८ गावांच्या शेती क्षेत्राची पाहणी करून उपयुक्त असा अहवाल संस्थानाधिपतींना सादर केला. त्याचप्रमाणे शेतीची पाहणी करीत असतानाच शेतकऱ्यांना शेती सुधारणेच्या

दृष्टीने त्यांनी उपयुक्त मार्गदर्शनही केले. याच वर्षी बाळासाहेबांनी शेतकऱ्यांच्या सोयीसाठी कुंडल, औंध, व किन्हई या ठिकाणी सहकारी पतपेढ्यांची स्थापना केली.

सन १९१९ नोव्हेंबर मध्ये बाळासाहेबांनी किन्हई येथील सरकारी जमिनीची पाहणी करण्यासाठी मुंबई सरकारचे इकॉनॉमिक बॉटनिस्ट व पुणे येथील वनस्पती शास्त्राचे प्रोफेसर डॉ. डब्ल्यू.बर्नस यांनी शेतजमिनीची पाहणी करून कोणत्या जमिनीत कोणत्या पिकांची लागवड करावी, कोणत्या जमिनीत फळझाडे उत्तम येतील यासंबंधी मौलिक मार्गदर्शन केले. शेतीच्या मशागतीसाठी आधुनिक पाश्चात्य शेती अवजारांचा संस्थानात उपयोग सुरू झाल्याशिवाय शेतीमालाचे उत्पादन वाढणार नाही हे ओळखून आधुनिक शेती अवजारांचा संस्थानात प्रचार करण्यासाठी बाळासाहेबांनी सन १९२०-२१ मध्ये न्यूयॉर्कहून मॉंटगॉमरी वार्ड ॲंड. को या कंपनीकडून सुमारे दीड दोन हजार रुपयांची शेती अवजारे विकत आणली. त्याचप्रमाणे या अवजारांचा उपयोग कसा करावा यासंबंधी प्रात्यक्षिके दाखवून लोकांना प्रत्यक्ष माहिती देण्याचा प्रयत्न सुरू केला होता. यापैकी काही अवजारे शेतकऱ्यांना भाड्याने देण्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय आधुनिक शेती अवजारापैकी उपयुक्त असा लोखंडी नांगर औंध संस्थानातच किर्लोस्करांच्या कारखान्यात तयार होत होते. हे नांगर ज्यांना खरेदी करणे अशक्य आहे अशा शेतकऱ्यांसाठी प्रत्येक तालुक्याच्या त्याचप्रमाणे प्रत्येक गावी जाऊन व्याख्याने करून, प्रात्यक्षिके दाखवून लोकांना आधुनिक शेतीसंबंधी माहिती दिली जात होती.[४]

सन १९२२-२३ मध्ये संस्थानच्या राज्यकारभाराची सात खात्यामध्ये विभागणी करून प्रत्येक खात्यावर स्वतंत्र सेक्रेटरीची नेमणूक करण्यात आली. त्याप्रमाणे शेतकी खात्याचे सेक्रेटरी म्हणून रा. शिवराम गोविंद दर्शने

बी.एजी. यांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी शेती सुधारणेसंबंधी लोकांना व्यवस्थित ज्ञान व्हावे यासाठी हस्तपत्रके छापून ती संस्थानातील प्रत्येक गावी वाटण्याची व्यवस्था केली. प्रत्येक गावी जाऊन लोकांना प्रत्यक्ष माहिती दिली. त्यामुळे लोकांत आधुनिकीकरणाची चळवळ सुरू झाली. सुधारित शेती व आधुनिक अवजारांच्या वापरासंबंधी लोकांना बरीच माहिती झाली. बाळासाहेबांनी तालुक्याच्या ठिकाणी जी आधुनिक अवजारे भाड्याने ठेवली होती त्यांना संस्थानातील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात मागणी येऊ लागली.

सन १९२६-२७ मध्ये बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी संस्थानातील सर्व जमिनीची पाहणी करून उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने उपयुक्त सूचना करण्यासाठी रा.सा. पंढरीनाथ आत्माराम इनामदार, एम.ए., बी.एससी. विद्याधिकारी व डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज सं., औंध, यांच्या अध्यक्षतेखाली शेतकी कमिशनची नेमणूक केली. त्यामध्ये रा.सा. शिवराम गोविंद दशनि बी.एजी., सेक्रेटरी शेतकी खाते सं., औंध व रा.सा. वासुदेवकृष्ण कुलकर्णी, बी.कॉम., बँक मॅनेजर व रजिस्टार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् हे इतर दोन सभासद मिळून एकूण तीन सभासदांचा समावेश होता. या कमिशनने सर्व संस्थानात फिरून जमिनीची व्यवस्थित पाहणी करून सरकारला आपल्या सूचनासह अहवाल सादर केला. यामध्ये शेतीची कायम सुधारणा, बागाईत क्षेत्रात वाढ करावी अशा उपयुक्त सूचनांचा समावेश होता. त्या दृष्टीने बाळासाहेबांनी शेतकऱ्यांना जमिनीस बांध, ताली घालून जमिनीची कायमची सुधारणा करण्यासाठी भांडवल दिले. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी विहिरी खोदून संस्थानातील बागाईत क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न केलेला दिसून येतो. संस्थानातील सर्व शेतकऱ्यांना ' शेती व शेतकरी ' हे मासिक सर्व संस्थानभर सुरू केले होते.[५]

तगाई :

संस्थानातील शेतीचे उत्पादन वाढवायचे असेल तर शेतकऱ्यांना 'शेती सुधारणेसाठी भांडवलाचा पुरवठा होणे आवश्यक आहे, हे लक्षात आल्यानंतर बाळासाहेबांनी सन १९१७-१८ मध्येच कुंडल, औंध, किन्हई या ठिकाणी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या सहकारी पतपेढ्यांची स्थापना केली. त्याचप्रमाणे त्यांनी सरकारातूनही शेतकऱ्यांना शेती सुधारणेसाठी ठराविक मुदतीने कर्जाऊ रक्कम देण्याची व्यवस्था केली. त्यास तगाई असे म्हटले जात असे. शेतकऱ्यांनी शेतीची कायम स्वरूपाची सुधारणा करावी. पावसाचे मान कमी असल्याने शेतीस योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होऊ शकत नाही यासाठी शेतकऱ्यांनी नवीन विहिरी खोदाव्यात, जुन्या दुरुस्त कराव्यात, शेतीला जागोजागी बांध, ताली घालाव्यात व सुपिकता वाढवावी. शेतीस उपयुक्त अवजारांची, जनावरांची खरेदी करावी आणि आपले उत्पन्न वाढवून आर्थिक परिस्थिती सुधारावी ही बाळासाहेबांची प्रामाणिक इच्छा होती. शेतीची व पर्यायाने शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी यासाठी बाळासाहेबांनी शेतकऱ्यांना तगाईच्या स्वरूपात भांडवल उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. याप्रमाणे सन १९०९-१० मध्ये ११,३२५ रुपये, सन १९१३-१४ मध्ये ४,५९५ रुपये, सन १९१४-१५ मध्ये २०० रुपये, सन १९१८-१९ मध्ये १२,५६९ रुपये, सन १९१९-२० मध्ये २,१४७ रुपये, सन १९२०-२१ मध्ये २३,९८५ रुपये, सन १९२१-२२ मध्ये २०० रुपये, सन १९२३-२४ मध्ये ६,५०० रुपये, सन १९२४-२५ मध्ये १६,६०० रुपये, सन १९२६-२७ मध्ये ४,८७४ रुपये, सन १९२७-२८ मध्ये १२,३५० रुपये १३ आणे, सन १९२९-३० मध्ये १४,१५० रुपये, सन १९३०-३१ मध्ये ८,३८३ रुपये ८ आणे, सन १९३९-४० मध्ये १०० रुपये, सन १९४२-४३ मध्ये १३,४८५ रुपये ८ आणे इतकी तगाई सरकारातून लोकांना दिली होती. म्हणजे सन १९२१-२२ अखेर एकूण ८३,९७९ रुपये १३ आणे व १९३३-३४ अखेर १,१७,६८९ रुपये १ पैसा इतके भांडवल तगाई रूपाने

बाळासाहेबांनी शेतकऱ्यांना देऊन मांडवला अभावी शेतकऱ्यांची होणारी कुचंबणा दूर केली.[६]

<u>सुधारीत बी-बियाणे</u> :

संस्थानातील शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी बाळासाहेबांनी तालुक्याच्या मुख्य ठिकाणी जास्त उत्पन्न देणाऱ्या आधुनिक बी-बियाणांचे डेपो ठेवून त्यातून संस्थानातील शेतकऱ्यांना लागणारे सुधारीत बियाणे पुरविण्याची व्यवस्था केली. यामध्ये अकोला बाजरी, आफ्रिकन किंवा जामनगर बाजरी, सुरतेकडील जोंधळा, पुसा गहू, सोयाबिन्स, बनिला कापूस, अपलँड कापूस, काबुली हरभरा, वॉशिंग्टन पोपई, अंजिरे व इतर फळझाडे पी.ओ.जी. ऊस, इत्यादी प्रकारच्या सुधारीत बियाणांचा समावेश होता. या सुधारीत बियाणांपैकी आफ्रिकन बाजरीचे बियाणे औंध संस्थान जामनगर संस्थानकडून दर पौंडास १ रुपाया या दराने विकत घेत होते. या आफ्रिकन बाजरीच्या बियाणाचे वैशिष्टय म्हणजे या बाजरीचे कणीस सुमारे दोन ते तीन फूट लांबीचे येत होते आणि एकरी उत्पन्नात सुमारे तीन ते चार पट इतकी वाढ होत होती. या बाजरीस जामनगर संस्थानच्या शेतकी खात्याने ' जामनगर जायंट ' (जामनगर राक्षसी बाजरी) असे नाव दिले होते. त्याचप्रमाणे रोगापासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी बियाणे गंधकात घोळून पेरण्यासंबंधी शेतकऱ्यांना माहिती दिली जात असे.[७]

संस्थानातील फॉरेस्टमध्ये जी रानटी जनावरे होती यापासून रयतेला नेहमीच त्रास होत होता. पिकांची नासधूस होत होती. बाळासाहेबांनी या रानटी जनावरापासून शेतकऱ्यांना त्रास होऊ नये, पिकांचे नुकसान होऊ नये यासाठी रखवालदार वगैरे नोकर ठेवून त्यांचा बंदोबस्त केला.

## शेतकी प्रदर्शन :

शेतीमालाचे उत्पादन वाढावे आणि लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारावी ही बाळासाहेबांची तळमळ होती. शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांनी अधिकाधिक सुधारीत तंत्राचा वापर करून शेतीमालाचे उत्पादन वाढवावे. त्याशिवाय शेतकऱ्यांनी उत्तम प्रतीचा माल शेतीतून निर्माण करावा यासाठी बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी तालुक्याच्या मुख्य ठिकाणी शेतकी प्रदर्शन भरविण्याची प्रथा सुरू केली. या प्रदर्शनामध्ये ज्या शेतकऱ्यांचा शेतीमाल उत्तम प्रतीचा असेल त्यास बाळासाहेब स्वत: बक्षीसे देत असत. त्याचा परिणाम शेतीमालाचा दर्जा सुधारणेस होत होता असे दिसून येते. सन १९१०-११ मध्ये शेतकी प्रदर्शनानिमित्त प्रोफेसर जे.बी. नाईट बाळासाहेबांच्या विनंतीनुसार औंधास आले. यावेळी प्रो. नाईट यांनी शेती सुधारणेसंबंधी व आटपाडी येथील खिलाराच्या जोपासनेसंबंधी मौलीक मार्गदर्शन केले. सन १९१६ च्या जानेवारी महिन्यात औंध येथील शेतकी व जनावरांचे प्रदर्शनासाठी बाळासाहेबांनी डॉ. मॅन यांना औंधला बोलावून घेऊन त्यांच्याच हस्ते बक्षीस वितरणाचा समारंभ घडवून आणला. त्यावेळी श्री. अनंत मोडक यांनी शेतकी सुधारणेसंबंधी लोकांना मार्गदर्शन केले. सन १९३४-३५ मध्ये आटपाडी, औंध, गुणदाळ व कुंडल या चारही तालुक्यांच्या ठिकाणी बाळासाहेबांनी शेतकी प्रदर्शन भरविली होती. लोकांना शेतीच्या सुधारीत पध्दतीची माहिती मिळावी, लोकांना शेतीमालाचे उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन मिळावे, लोकांनी उत्तम प्रतीचा शेतीमाल निर्माण करावा, उत्पादन वाढून शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती व्हावी व त्यायोगे संस्थानचे उत्पन्न वाढावे हा बाळासाहेबांचा या धडपडीमागील प्रामाणिक उद्देश होता.[८]

अन्नधान्या बरोबरच संस्थानात भाजीपाला, फळफळावळांचेही उत्पादन वाढावे यासाठी फळझाडांची लागण करणाऱ्यास त्यांनी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले होते.

अशाप्रकारे बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी आपल्या कारकिर्दिमध्ये शेती सुधारणेसाठी शेतीमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी अव्याहतपणे प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यामुळेच त्यांच्या कारकिर्दित शेतीपासून संस्थानाला मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते. सन १९०९-१० मध्ये संस्थानला जमीन महसूलापासून रुपये १,९०,५३२ उत्पन्न मिळत होते हेच उत्पन्न सन १९१९-२० मध्ये रुपये २,०२,६८९, सन १९२९-३० मध्ये रुपये २,१९,३११ आणि सन १९३९-४० मध्ये २,०७,७०४ रुपये १३ आणे ६ पैसे झालेले दिसून येते. यावरुन बाळासाहेबांच्या कारकिर्दिच्या सुरुवातीच्या दहा वर्षांत जमीन महसूलात १२,१५७ रुपये, वीस वर्षांत २८,७७९ रुपये व तीस वर्षांत १७,१७२ रुपये अशी वाढ झालेली दिसून येते. संस्थानच्या महसूली उत्पन्नात झालेल्या वाढीस प्रामुख्याने बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचे शेतीविषयक धोरण कारणीभूत असल्याचे दिसून येते.[९]

ब) पशुपालन : पूरक उद्योग :

संस्थानातील लोकांनी केवळ शेती व्यवसायावरच अवलंबून न राहता शेतीबरोबरच पशुपालनाचा शेतीस पूरक असा जोडधंदा सुरु केला तर शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. त्याचबरोबर संस्थानच्या उत्पन्नातही वाढ होईल याची बाळासाहेबांना खात्री होती. यासाठी त्यांनी पूरक उद्योगांना उत्तेजन दिले. पशुपालनाच्या धंद्यास प्रोत्साहन मिळावे या हेतूने शेती प्रदर्शनाचे वेळीच संस्थानातील उत्तम जनावरांनाही बक्षीसे देण्यास त्यांनी सुरुवात केली. त्याचप्रमाणे औंध, आटपाडी, करगणी, कुंडल, बोबलाद इत्यादी ठिकाणी यात्रा व जनावरांचे बाजार भरवून चांगल्या जनावरांना बक्षीसे देण्याची प्रथा सुरु केली. गाई, बैल ही जनावरे शेतीस उपयुक्त अशीच होती. त्यामुळे या पाळीव जनावरांची संस्थानात संख्या वाढावी, त्यांची योग्य निपज व्हावी यासाठी बाळासाहेब प्रयत्नशील होते. एवढेच नव्हे तर घरटी एक गाय पाळल्यास त्या गावास एक वर्षाचा शेतसारा माफ करण्याचे त्यांनी जाहीर केले होते. त्यावेळी संस्थानातील आटपाडी येथील खिलार व गुणदाळ येथील

सोरटी जनावरे सुप्रसिध्द होती. औंध येथील सरकारी फार्ममध्ये सिंध, हिस्सार, दिल्ली, गिरजातीची जनावरे होती. त्याचप्रमाणे संस्थानातील अनेक गावी जनावरांची उत्तम पैदास व्हावी यासाठी सिंधी वळू बैल व दिल्ली जातीचे रेडे ठेवण्यात आले होते. एक अरब वळू घोडा आटपाडी येथे ठेवण्यात आला होता.

सन १९१०-११ मध्ये पुणे शेतकी कॉलेजचे शेतकी विषयाचे प्रोफेसर जे.बी. नाईट यांनी आटपाडीचे खिलार पाहून इनब्रिडिंग होऊ नये यासाठी दोन अमृत महाल जातीचे वळू बैल आणण्याबद्दलची सूचना केली होती. त्याप्रमाणे सन १९१३-१४ मध्ये औंध संस्थानने आटपाडी खिलाराची उत्तम पैदास व्हावी यासाठी प्रो. नाईट यांच्याच संमत्तीने अमृत महाल जातीचे तीन वळू बैल खरेदी केले. अशाप्रकारे राज्यकर्त्यांच्या अनेकविध प्रयत्नामुळे व प्रोत्साहनामुळे संस्थानातील जनावरांच्या संख्येत विसाव्या शतकात लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. सन १९०९-१० मध्ये संस्थानात १२,८४१ बैल, १०,८८७ गाई, ४,०५२ म्हैशी व ४३० रेडे व ७५,५५५ शेळ्या व मेंढया होत्या. सन १९२२ मध्ये संस्थानात १४,२१० बैल, १२,२११ गाई, ४,५१४ म्हैशी, ३११ रेडे व ६२,६०६ शेळ्या व मेंढया होत्या. सन १९३४-३५ मध्ये संस्थानात १६,३०२ बैल, ११,५६० गाई, ६,०७६ म्हैशी, व ८०,२९२ शेळ्या व मेढया होत्या. म्हणजेच बाळासाहेबांच्याच कारकिर्दित संस्थानातील पशुधनात चांगलीच वाढ झाल्याचे दिसते. सन १९४५-४६ मध्ये संस्थानात १४,८६५ बैल, ८,६५९ गाई, ४,२९४ म्हैशी, २८८ रेडे, २०,९२७ शेळ्या व ६३,७१६ मेंढया होत्या. ६३,७१६ मेंढयापैकी आटपाडी तालुक्यात २६,००० व खरसुंडी तालुक्यात २७,००० मेंढया होत्या. म्हणजे ५३,००० मेंढया या दोन तालुक्यातच होत्या असे दिसते. सन १९४५-४६ मध्ये गाई-म्हैशी यांच्या दुधापासून वार्षिक रूपये १०,८०,००० व मेंढयांच्या लोकरीपासून रूपये ५०,००० इतके उत्पन्न संस्थानला मिळत होते. संस्थानात लोकरीपासून कपडे बनविण्याचे माग चालू होते व त्याद्वारा रूपये १,६९,५०० किंमतीचा माल तयार होत होता. म्हणजे संस्थानला शेतीला पूरक असणाऱ्या व्यवसायापासून वार्षिक रूपये १२,९९,५०० इतक्या मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळत होते.[१०]

संस्थानातील पशुधन वाढावे, त्याची उत्तम पैदास व्हावी, त्यांना भरपूर चारा मिळावा व जमिनीसही भरपूर खत मिळावे यासाठी बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे प्रयत्न सतत चालू होते. त्यांनी संस्थानातील ७२ गावांपैकी ५१ गावांना मोफत गायराने दिली होती. आटपाडीस जे सरकारी खिलार होते त्यासाठी आटपाडी गावी ३७५ एकर ३ गुंठे व माडगुळे या गावी ३८९ एकर ११ गुंठे क्षेत्र गुरांना चारण्यासाठी सोडले होते. या गायरान क्षेत्रात इतर लोकांना देखील जनावरे चारण्यास परवानगी होती. सन १९३५ मध्ये संस्थानात ५१ गावांना मिळून ६,६८८ एकर २ गुंठे जमीन गुरांना चारण्यासाठी मोफत गायराने म्हणून सोडलेली होती.[११]

क) उद्योगधंदे :

औंध संस्थानचे विसाव्या शतकातील कर्तबगार अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी स्वत: उद्योगप्रिय होते. औंध संस्थानचे औद्योगिकरण करणे हे त्यांचे स्वप्न होते. औद्योगिक प्रगती झाल्याशिवाय संस्थानातील प्रजा सुखी होणार नाही, अशी त्यांची खात्री होती. संस्थानात अनेक उद्योगधंद्यांचा विकास झाल्यास लोकांना रोजगार उपलब्ध होईल, शेतीवरील लोकांचा वाढता बोजा कमी होईल आणि लोकांची व पर्यायाने संस्थानची आर्थिक प्रगती होईल असे त्यांचे मत होते. आपल्या गरजा या परावलंबी असता कामा नयेत. आपल्या राज्यातील कच्चा माल आपणच उपयोगात आणून त्याचा पक्का तयार केला पाहिजे आणि असे झाले तर मजुरीसाठी लोकांना संस्थानाबाहेर जाण्याचा प्रश्न येणार नाही असे त्यांना वाटत होते. यासाठी त्यांनी संस्थानमध्ये अनेक उद्योगधंदे सुरू केले. उद्योगसमूह लहान असो किंवा मोठा त्याला एक आश्रय लागतो. हा आश्रय पैशाचा असतो, मोकळ्या हवेचा असतो, व विकासाला लागणाऱ्या स्वार्तऱ्याचा असतो. अशाप्रकारचा आश्रय संस्थानातील उद्योगधंद्यांना बाळासाहेबांनी दिला. त्यांच्या सक्रीय मदतीमुळेच किर्लोस्करांचा शेती अवजारांचा

कारखाना, ओगलेंचा काच कारखाना, औंध सोफ वर्क्स, जिनिंग फॅक्टरीज् सूत विणण्याचे हातमाग, लोकरीचे माग असे छोटे मोठे उद्योगधंदे संस्थानात विकसित झाले.

<u>किर्लोस्कर उद्योगसमूहाची मुहूर्तमेढ</u> :

आज संपूर्ण देशाला भूषणावह ठरलेल्या किर्लोस्कर उद्योगसमूहाची मुहूर्तमेढ औंध संस्थानात रोवली गेली याची फारच थोडया लोकांना कल्पना आहे. हा उद्योगसमूह छोटयाशा औंध संस्थानात कोणत्या परिस्थितीत सुरू झाला याविषयी या ठिकाणी माहिती देणे आवश्यक आहे. किर्लोस्कर बंधूंचा सुप्रसिध्द शेती अवजारांचा कारखाना हा मूळचा बेळगाव येथील म्हणजे खालसा मुलुखातील. सन १९०४ मध्ये त्यांनी बेळगाव येथे शेतीची अवजारे तयार करण्याचा कारखाना सुरू केला. परंतु गावापासून दूर ज्या माळरान जागेवर किर्लोस्करांचा कारखाना उभा होता त्या माळावर प्लेगाच्या साथीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून मध्यमवर्गीय लोकांची वस्ती वाढू लागली. त्यामुळे ती जागा गाव वसविण्यासाठी उपयोगात आणण्याचे बेळगाव म्युनिसिपालीटीने ठरविले. परिणामत: किर्लोस्करांना या जागेवरून आपला कारखाना हलविण्याची नोटीस मिळाली. त्यामुळे चालक मंडळी दुसऱ्या सोयीस्कर जागेच्या विवंचनेत असतानाच डिसेंबर १९०९ मध्ये बाळासाहेब प्रतिनिधींना बेळगाव मुक्कामीच किर्लोस्करांच्या कारखान्यावर आलेल्या संकटाची वार्ता समजली. हा कारखाना आपल्या संस्थानात सुरू केला तर त्याचा संस्थानच्या प्रगतीस फार मोठा उपयोग होईल हे ओळखून बाळासाहेबांनी किर्लोस्कर बंधूंचा कारखाना आपल्या संस्थानात आणावयाचे ठरविले. त्याप्रमाणे कुंडल रोड स्टेशन जवळची ३८ एकर जमीन व १०,००० रुपये भांडवल देऊन त्यांनी हा कारखाना २६ जानेवारी १९१० रोजी औंध संस्थानात आणला. अशाप्रकारे सुप्रसिध्द किर्लोस्कर उद्योग-समूहाचा औंध संस्थानात जन्म झाला. सुरुवातीस या कारखान्यास अनेक संकटांना

तोंड द्यावे लागले परंतु संस्थानाधिपतींचा उदार आश्रय व किर्लोस्कर बंधूंची चिकाटीवृत्ती यामुळे हा कारखाना औंध संस्थानात टिकून राहिला व विकास पावला. काळाच्या ओघात किर्लोस्करांच्या या छोटयाशा कारखान्याचे रूपांतर उद्योगसमूहात झाले. त्या उद्योगसमूहाने महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर नाव कमावले आहे.[१२]

सन १९१० मध्ये किर्लोस्कर बंधूंचा कारखाना संस्थानात सुरू झाला व सन १९२० मध्ये या कारखान्याचे दहा लाख रुपये भांडवलाच्या लिमिटेड कंपनीमध्ये रूपांतर झाले. म्हणजे केवळ दहा वर्षातच या कारखान्याचे खाजगी स्वरूप बदलून त्यास लिमिटेड कंपनीचे स्वरूप प्राप्त झाले. यावरून या कारखान्याच्या झपाटयाने झालेल्या प्रगतीची आपणास कल्पना येते. हा कारखाना लोखंडी नांगर तयार करण्याच्या बाबतीत प्रसिध्द होता. परदेशी नांगराशी किर्लोस्कर बंधूंच्या लोखंडी नांगरास बाजारपेठेत नेहमीच स्पर्धा करावी लागत होती अशा परिस्थितीतसुध्दा किर्लोस्कर लोखंडी नांगराने आपली मागणी वाढती ठेवली होती. हे किर्लोस्कर कंपनीचे वैशिष्टय होय. नांगराशिवाय शेतीस लागणाऱ्या इतर अवजारांचेही उत्पादन या कंपनीत होत होते. ती अवजारे म्हणजे कडबा कापण्याची यंत्रे, मोटेची चाके, बैलगाडयांची चाके, हात कोळपणी, ऊस गाळण्याचे चरख इत्यादी होत. त्याचप्रमाणे शेंगा फोडण्याच्या यंत्रासाठी लागणारे सर्व ओतीव भाग, ड्रिलिंग मशीन, पुणे नमुन्याच्या चरकास लागणाऱ्या लाटी, पाटा, कणे, नट, बोल्ट, पोलादी फर्निचर, ब्रॅकेट्स, चाके, इरिगेशन पंप, स्प्रिंग कॉटस् इत्यादी अनेक प्रकारचे उत्पादन या कारखान्यात होत होते. त्याचप्रमाणे ३ बी.एच.पी. चे पहिले ऑईल व गॅस इंजीन या कंपनीने तयार केले होते. यावरून या कंपनीत शेती व्यवसायासाठी लागणारी सर्व अवजारे तयार केली जात होती असे दिसून येते. या कंपनीत तयार होणाऱ्या मालापैकी सांगलीचे कारखानदार रा. भिडे व दांडेकर यांना शेंगा फोडण्याच्या यंत्रासाठी लागणारे

सर्व ओतीव भाग पुरविले जात. त्याचप्रमाणे बारामतीच्या व्यापाऱ्यास चरकास लागणारे लाटी, पाटा, कणे हे भाग पुरविले जात.[१३]

सन १९२६ ऑक्टोबरमध्ये पुणे येथे मुंबई इलाख्याचे एक प्रचंड शेतकी प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात सर्वांत मोठा शेतकी अवजारांचा स्टॉल रा. किर्लोस्कर बंधू यांचाच होता. या प्रदर्शनात किर्लोस्कर बंधूनी आपल्या कारखान्यात तयार केलेले पहिले ३ बी.एच.पी. चे ऑईल व गॅस ईंजीन चालू स्थितीत मांडले होते. या प्रदर्शनात किर्लोस्कर बंधूना उत्कृष्ट शेती अवजाराबद्दल एक सोन्याचे, एक चांदीचे व तीन ब्राँझची मिळून एकूण पाच पदके मिळाली. यावरून आपणास या कंपनीच्या उत्पादनाची प्रत काय होती याची कल्पना येते.[१४]

छोटयाशा औंध संस्थानात सुरू झालेला हा कारखाना केवळ औंध परिसरापुरताच मर्यादित न राहाता लवकरच त्याच्या सोलापूर, हरिहर, पुणे, इत्यादी ठिकाणी शाखा निर्माण झाल्या. सन १९३० नंतर वाढत्या उत्पादनासाठी विस्तृत बाजारपेठ मिळविण्यासाठी उज्जैन, बंगलोर या ठिकाणी या कंपनीने स्वत:ची दुकाने उघडली. त्याचप्रमाणे कलकत्ता, लाहोर, कराची, मद्रास इत्यादी दूरच्या शहरातही एजंटची नेमणूक करून कंपनीने आपल्या मालाचा प्रसार केला. एवढेच नव्हे तर जर्मनीपर्यन्त या कंपनीने बाजारपेठ मिळविलेली दिसून येते. सन १९२१ मध्ये या कंपनीस निव्वळ नफा ४३,५७३ रुपये ३ आणे ६ पैसे इतका होता. यापैकी ६ टक्के डिव्हीडंड भागीदारांना वाटण्यात आला. सन १९२२ मध्ये कंपनीस एकूण १,८०,६५६ रुपये १३ आणे ११ पैसे नफा झाला. यापैकी १५ टक्के डिव्हीडंड भागीदारांना वाटण्यात आला. सन १९२४ मध्ये २,५९,६०९ रुपये ८ आणे ११ पैसे एकूण नफ्यापैकी १५ टक्के डिव्हीडंड भागीदारांना वाटण्यात आला. सन १९२६ मध्ये या कंपनीस कसलाही फायदा न होता ३४,०२६ रुपये तोटा झाला. तर सन १९३४ मध्ये ४६,३३६ रुपये १० आणे

११ पैसे नफा झाला. अशाप्रकारे या कंपनीस तेजीमंदीस तोंड द्यावे लागत होते. असे असले तरी या कंपनीने आपला उद्योग बराच वाढवून केवळ देशात नव्हे तर परदेशातही नाव मिळविले.[१५]

सन १९२० एप्रिलमध्ये मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉईड यांनी या कारखान्यास भेट दिली. त्यावेळी त्यांनी पुढील उद्गार काढले. " किर्लोस्कर बंधूंचा कारखाना बेळगांवहून जाऊ देण्यात ब्रिटिश सरकारने मोठी चूक केली, तथापि या चुकीचा श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी उपयोग करून घेतला याचा मला फार संतोष वाटतो." यावरून ब्रिटिश सरकारला देखील या कारखान्याचे महत्त्व जाणवले होते हे दिसून येते. त्याचप्रमाणे सन १९२८ एप्रिल मध्येही मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन व लेडी विल्सन यांनी या कारखान्यास भेट देऊन समाधान व्यक्त केले.

<u>ओगले यांचा काच, कंदिल व एनॅमल कारखाना</u> :

औंध संस्थानातील दुसरा महत्त्वाचा उद्योगसमूह म्हणजे ओगलेबंधूंचा काच कारखाना हा होय. सन १९१३ मध्ये ओगले बंधूपैकी श्रीपाद प्रभाकर ओगले यांनी बाळासाहेब पंतप्रतिनिधी व किर्लोस्कर बंधूंच्या मदतीने औंध संस्थानात कऱ्हाड स्टेशन शेजारी आपल्या काच कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. या कारखान्यासाठी बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी १५ एकर जमीन रुपये २,००० भांडवल देऊन भरीव मदत केली या कारखान्याचे सुरुवातीचे एकूण भांडवल फक्त २,००० रुपये इतके होते. आणि ते बाळासाहेबांनी सरकारातून दिलेले होते. सुरुवातीला या कारखान्यात कामगार केवळ २० ते २५ होते. ओगले बंधूंनी तुटपुंज्या सामुग्रीनिशी कारखाना सुरू केला व आपल्या कर्तबगारीने तो वाढवून नावारूपास आणला. इ.स. १९२० मध्ये या कारखान्याचे लिमिटेड कंपनीत रूपांतर झाले.[१६]

या कारखान्यात सुरुवातीस बांगडीस लागणारी काच वगैरे ठराविक माल तयार होत होता. परंतु सन १९२० मध्ये ओगलेबंधूपैकी रा. गुरुनाथ ओगले यांना मुंबई सरकारने काचेच्या धंद्यातील उच्च शिक्षणाकरिता दोन वर्षांची गव्हर्नमेंट ऑफ इंडिया स्कॉलरशिप देऊन त्यांना इंग्लंड व अमेरिकेस पाठविले. त्यांच्या अद्ययावत ज्ञानामुळेच या कारखान्यात १९२० नंतर अनेकविध वस्तू तयार होऊ लागल्या. बांगडीची रंगीत काच, काचेच्या चिमण्या, इमारतीच्या छतास असणारे रंगीबेरंगी बिलोरी गोळे, पेपरवेटस्, फ्लॉवर प्लॉटस्, दाती, ताबकड्या डिशेस, लेमन प्रेसर, ड्रिंकिंग-ग्लास, टम्बलर्स, वाटया, स्टँडस्, इलेक्ट्रिक दिव्यांचे शेडस्, प्रेस्ड वेअर, मंगलोरी कौले इत्यादी अनेक प्रकारच्या काचेच्या वस्तूंचे उत्पादन वाढले. त्याचप्रमाणे एनॅमलच्या भांड्यांची लोकांकडून येणारी वाढती मागणी पाहून सन १९२४ नंतर जेवणाच्या थाळ्या, बेसिन्स, चहादाण्या, चमचे, बादल्या बेड पॅन्स, एनिमा पॉट्स्, सूचना-धोका दर्शविणाऱ्या पाटया, ब्लॅकबोर्डस, टेबल, वॉल कॅलेंडर्स, टम्बलर्स, साईन बोर्डस्, गेज, प्लेटस्, अंमग स्लेट पाटया अशा एनॅमलच्या अनेक वस्तू तयार करण्यासाठी काच कारखान्यातच ओगले बंधूंनी एनॅमलची स्वतंत्र शाखा सुरु केली. या कामासाठी लागणारी एनॅमलस् कारखान्यातच तयार केली जात होती हे विशेष होय. एनॅमलच्या वस्तूंना मुंबईतील मोठमोठया युरोपियन कंपन्या, रेल्वे, पोस्ट, तारखाते, इरिगेशन खाते यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर मागणी होती. त्याचप्रमाणे सन १९२३-२४ मध्ये नागेश प्रभाकर ओगले यांना बाळासाहेबांनी कंदील तयार करण्याची यंत्रे खरेदी करण्यासाठी रुपये ५०,००० चे भांडवल देऊन जर्मनीस पाठविले. सन १९२५ ते २७ या काळात ओगले यांचा पितळी `प्रभाकर` कंदील बाजारात अत्यंत लोकप्रिय झाला. मुंबई व मध्य प्रांत सरकारची त्याला मान्यता मिळाली. एवढेच नव्हे तर पुणे, कानपूर, बंगलोर येथील प्रदर्शनामध्ये ओगले बंधूंच्या `प्रभाकर` कंदीलास अनेक पदके मिळाली. यावरून ओगले बंधूंनी उत्तम प्रतीचा कंदील बनविला होता याची कल्पना येते. त्यानंतर सन १९३३ नंतर ओगले बंधूंनी

लोकप्रिय असा ' प्रभाकर परफेक्ट सेफ्टी स्टोव्ह ' चे देखील उत्पादन सुरू केले. या स्टोव्हला मुंबई, मद्रास मध्य प्रांत या ठिकाणाहून मोठी मागणी होती.[१७]

सन १९१३ मध्ये म्हणजे सुरूवातीस या कंपनीचे एकूण भांडवल रूपये फक्त २,००० रूपये होते हे वर सांगितले आहेच. सन १९२४ मध्ये या कंपनीचे अंदाजे भांडवल रूपये २,००,००० इतके झाले. यापैकी रूपये १०,००० सरकारी होते. व त्यावेळी कारखान्यातील कामगारांची संख्या अंदाजे २०० होती. सन १९३४ मध्ये कंपनीचे भांडवल रू.५,८५,००० इतके झाले. यापैकी सरकारी भांडवल रूपये ७५,००० होते व कामगारांची संख्या सुमारे ६५० इतकी झाली. म्हणजे या कंपनीने २० वर्षात आपले भांडवल २,००० रूपयांपासून ५ लाखापर्यन्त व कामगारांची संख्या २०-२५ पासून ६५० पर्यन्त वाढविण्याची किमया केली. सन १९३३ पर्यन्त या कंपनीने जवळ जवळ २,२०,४६,७९८ रूपये किंमतीचा माल बनवून विकला. यापैकी एनॅमल मालाची विक्री रूपये १,३१,८८१ व कंदिलांची विक्री रूपये ७,९६,०५१ इतकी होती.[१८]

साबण कारखाना :

किर्लोस्कर व ओगले या दोन प्रमुख उद्योगसमूहाशिवाय संस्थानात इतरही लहान मोठे उद्योग धंदे स्थापन करण्याचा बाळासाहेबांनी प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांनी सन १९३० मध्ये आपले पुतणे आण्णासाहेब यांना बेंगलोर व कालिकत येथे प्रशिक्षणासाठी पाठवून आपल्या संस्थानात ओगलेवाडी येथे ' औंध सोप वर्क्स ' हा साबणाचा कारखाना काढावयास सक्रिय मदत केली. या पाठीमागे संस्थानात उद्योगधंदे वाढवून संस्थानची आर्थिक प्रगती व्हावी हाच बाळासाहेबांचा हेतू असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे संस्थानातील कारखान्यांच्या मालाची जाहिरात करण्यासाठी, कॅलेंडर्स, लेबल, पोस्टर्स वगैरे छापण्यासाठी संस्थानचा होणारा हजारो रूपयांचा खर्च वाचविण्यासाठी किर्लोस्करवाडीसच

क-हाडचे श्री. भुवनेश्वरी प्रेसचे मालक रा. बळवंतराव कुलकर्णी यांना सक्रीय मदत देऊन श्री. भुवनेश्वरी छापखाना सुरू केला.

अशाप्रकारे औंध संस्थानचे अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या उद्योगधंद्यास सक्रिय मदत करण्याच्या उदार धोरणामुळे औंध संस्थानात त्यांच्या कारकिर्दित अनेक उद्योगधंदे उदयाला येऊन विकास पावल्याचे दिसून येते. ओगले व किर्लोस्कर उद्योग समूह ही बाळासाहेबांच्या सक्रिय मदतीची जिवंत स्मारके होत. या उद्योग समूहांचे अत्यंत महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सन १९४५-४६ मध्ये या दोन उद्योग समूहापासून फक्त प्राप्तीकराच्या रुपाने औंध संस्थानला वार्षिक ८,००,००० रुपये उत्पन्न मिळाले आणि हे उत्पन्न संस्थानच्या त्या वर्षीच्या जमीन महसूलापेक्षाही जास्त होते. यावरुन संस्थानच्या आर्थिक विकासात उद्योगधंद्यांचे असणारे स्थान आपल्या लक्षात येते. सन १९४५-४६ मध्ये संस्थानात दहा कारखाने व इतर उद्योग सुरू होते. सर्व उद्योगांचे मिळून भाग भांडवल रुपये ३२,५०,००० इतके होते. हे भांडवल ११,००० भाग-धारकांमध्ये विभागलेले होते. सर्व उद्योगातील कामगारांची एकूण संख्या ३,२०० इतकी होती.[१९]

<u>इतर उद्योग धंदे</u> :

आपल्या भारतभूमीस पूर्वी ` सुवर्ण भूमी ` असे म्हटले जात असे. कारण आपल्या देशात अनेक लहान मोठे उद्योग धंदे अस्तित्वात होते. आपण जगाच्या इतर भागातील लोकांस अनेक जीवनावश्यक गोष्टी पुरवित होतो. त्यामुळे कोटयावधी रुपयांच्या संपत्तीचा ओघ दरसाल परदेशातून आपल्याकडे वहात होता. परंतु यंत्रयुगास प्रारंभ झाल्यानंतर ही परिस्थिती झपाटयाने बदलत गेली. हिंदभूमीस अत्यंत हीनावस्था प्राप्त झाली. विसाव्या शतकात देशासमोर स्वातंत्र्यप्राप्ती इतकाच महत्वाचा दुसरा प्रश्न पोटापाण्याचा बनला. जी स्थिती देशाची तीच भारतातील संस्थानांची होती. परंतु औंध संस्थानचे उद्योगप्रिय अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी आपल्या संस्थानातील ही परिस्थिती बदलण्याचा आपल्या कारकिर्दित अव्याहतपणे प्रयत्न केला.

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

बाळासाहेब पंतप्रतिनिधी स्वत: उद्योगप्रिय होते. संस्थानात अनेक लहान मोठया उद्योगधंद्यांचा विकास व्हावा अशी त्यांची प्रथम पासूनच इच्छा होती. संस्थानातील गुणदाळ व आटपाडी तालुक्यात मोठया प्रमाणावर कापूस पिकतो. तो कापूस कच्च्या स्वरुपात न विकता या कापसापासून आपण सूत तयार करुन, ते विणून कापड तयार केले व ते विकले तर त्यापासून मोठ्या प्रमाणावर फायदा मिळेल, हे लक्षात आल्यानंतर बाळासाहेबांनी गुणदाळ व आटपाडी तालुक्यात दिघंची येथे जिनिंग फॅक्टरींची स्थापना केली. त्यामुळे संस्थानातील लोकांना रोजगार उपलब्ध होऊन कापसापासून मिळणारे उत्पन्न वाढू लागले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना धंदे शिक्षण मिळावे त्यांनी केवळ नोकरीवरच अवलंबून न राहता स्वतंत्र धंदा सुरु करावा व आपले उत्पन्न वाढवावे यासाठी बाळासाहेबांनी सन १९३२ मध्ये औंध येथे स्वतंत्र टेक्निकल स्कूलची स्थापना केली. या संस्थेत शिक्षण घेऊन अनेकांनी सुतारकाम, लोहारकाम, चित्रकला, सूत काढणे, विणकाम, मातकाम वगैरे अनेक स्वतंत्र उद्योगधंदे सुरु केले. संस्थानातील प्रत्येक शाळेत सूत काढणे सक्तीचे बनविले होते. विद्यार्थ्यांना विणकाम शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमले होते. त्याचप्रमाणे या कुटिरोद्योगास प्रोत्साहन मिळावे यासाठी शेतकऱ्यांना शेतसारा सूताच्या रुपाने भरण्याची सवलत देण्यात आली होती. बाळासाहेबांच्या या धोरणामुळे संस्थानातील औंध, आटपाडी, कुंडल, गुणदाळ या चारही तालुक्यात लहान मोठया प्रमाणावर हातमागाचा धंदा चालत होता. खटया गुणदाळ तालुक्यात सुमारे २०० हातमाग चालू होते. या कुटिरोद्योगास प्रोत्साहन देऊन बाळासाहेबांनी संस्थानचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.[२०]

खुद्द औंध येथे बाळासाहेबांनी कुंभार, सुतार, चांभार, चित्रकार, मूर्तिकार वगैरे कारागिरांना आश्रय दिला होता. रा. पांडोबा पाथरवट व त्यांचे दोन मुले राजाराम व महादेव यांना योग्य मार्गदर्शन व सक्रिय मदत देऊन औंध येथे स्टॅच्युअरी डिपार्टमेंटच काढण्यात आले. येथे दगडाच्या आधुनिक

पध्दतीच्या मूर्ती व पुतळे आणि सुबक हस्तिदंती काम होत असे. त्या वस्तूंना दूरदूरच्या ठिकाणाहून मागणी येत होती. जांब येथील श्री समर्थ रामदासाची मूर्ती पुणे स्टेशनवरील प्रिन्स ऑफ वेल्सचा संगमरवरी पुतळा, पुणे रेमार्केट मधील विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा पुतळा, अनाथ विद्यार्थी गृहांतील वीर रामाची मूर्ती, इंदूर येथील गोपालकृष्णाची, नाशिक येथील सूर्यनारायणाची, औंध येथील दत्त, सरस्वती, रामपंचायतन, शिवपंचायतन वगैरे अनेक मूर्ती व पुतळे औंध येथील स्टॅच्युअरी डिपार्टमेंटमध्ये तयार झालेले आहेत. अशाप्रकारे बाळासाहेबांनी संस्थानात अनेक लहान लहान उद्योग धंद्यांचा विकास घडवून आणला.[२१]

ड) व्यापार -

औंध संस्थानातील भौगोलिक परिस्थिती व्यापार वाढीस फारशी अनुकूल नव्हती. संस्थानात औंध येथे दर आठवड्यातून मंगळवारी इतर वस्तूंचा व शनिवारी गुरांचा बाजार भरत असे. किन्हई येथे बुधवारी बाजार भरत असे. या ठिकाणी लोकांना आवश्यक वस्तूंची खरेदी विक्री करता येत होती. आटपाडी तालुक्यात आटपाडी येथे दर शनिवारी, दिघंची येथे रविवारी, करगणी येथे गुरुवारी, खरसुंडी येथे रविवारी, झरे येथे सोमवारी बाजार भरत असे. या ठिकाणी लोकांचा व्यापार विनिमय चालत असे. कुंडल तालुक्यात कुंडल येथे रविवारी बाजार भरत असे. या ठिकाणी लोकांना देवघेव करता येत होती. गुणदाळ तालुक्यातील लोकांना मात्र खरेदी-विक्रीसाठी विजापूर व जमखंडी या ठिकाणी जावे लागत असे. सन १९३९-४० मध्ये गुणदाळ येथे बाजार सुरू करण्यात आला.[२२]

अशाप्रकारे संस्थानात एकही मोठी बाजारपेठ नव्हती. त्याचप्रमाणे मोठ्या लोकसंख्येचे एकही शहर नव्हते. त्यामुळे किर्लोस्करवाडी व ओगलेवाडी ही कारखान्यांची दोन गावे मात्र व्यापारास अनुकूल होती. कारण तेथे पोस्ट ऑफिस, तार ऑफीस, रेल्वे स्टेशन, बँकेची शाखा या सुविधा उपलब्ध होत्या.

त्यामुळे याच ठिकाणी मोठा व्यापार चालत होता असे दिसते. त्याचप्रमाणे संस्थानातील औंध, दिंघची, कुंडल, आटपाडी इत्यादी ठिकाणी अल्प प्रमाणात व्यापार चालत होता. सन १९३९-४० मध्ये कुंडल तालुक्यातील बिचूद या ठिकाणी बाजार सुरू केल्यामुळे या ठिकाणीही व्यापारी उलाढाल होऊ लागली.[२३]

औंध संस्थानात बाहेरून काही माल आयात करावा लागत होता. तांदुळ, साखर, मीठ, नारळ, खोबरे, मसाला, दगडी कोळसा, लाकूड, फरशा, कौले, सोडा, माडी, कोक, रॉकेल, काच करण्यासाठी लागणारा कच्चा माल, रासायनिक द्रव्ये, औषधे, यंत्रे, हत्यारे, लोखंड, फोटोग्राफीचे सामान, स्टेशनरी, कापड, सूत, लोकर, इत्यादी माल संस्थानला आयात करावा लागत होता.[२४] संस्थानात आयात होणाऱ्या मालापैकी बराच माल किर्लोस्करवाडी व ओगलेवाडी येथील अनेक उद्योगधंद्यासाठी लागणारा होता.

संस्थानला ज्याप्रमाणे काही गोष्टींची आयात करावी लागत होती, त्याचप्रमाणे संस्थान काही गोष्टींची निर्यातसुध्दा करत असे. ज्वारी, बाजरी, गहू, मुगमूग, हळद, हरभरा, आळशी (जवस), करडी, कापूस, लोकर, खादी, लुगडी, काचेच्या चिमण्या, बांगडीची काच, कंदील, पेपरवेटस्, लोखंडी नांगर, कढई, पलंग, खुर्च्या, टेबले, पंप्स, चरक, मोटेची चाके, साबण इत्यादी बाबी संस्थानातून निर्यात केल्या जात होत्या.[२५] औंध संस्थानातून निर्यात होणाऱ्या मालापैकी बराचसा माल किर्लोस्कर व ओगले यांच्या कारखान्यात तयार होत होता.

अशाप्रकारे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी आपल्या कारकिर्दीत शेती, उद्योगधंदे, व्यापार या क्षेत्रात अनेक उपाय योजून अमुलाग्र बदल घडवून आणले व संस्थानची भरीव आर्थिक प्रगती घडवून आणली. त्यांच्याच कारकिर्दीत औंध संस्थानची सर्वांगिण प्रगती झालेली दिसून येते.

बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी औंध संस्थानचे उत्पन्न हरप्रयत्नाने वाढवून आर्थिक प्रगती साधण्याचे प्रयत्न केले असले तरी संस्थानातील सर्वसामान्य लोकांची आर्थिक प्रगती झाली, समाजामधील आर्थिक विषमता संपुष्टात येऊन तेथे आर्थिक समानता निर्माण झाली असे आपणास म्हणता येत नाही. कारण सन १९४५-४६ मध्ये संस्थानात एकंदर १८,४१२ कुटुंबे होती. त्यापैकी ३,०८२ कुटुंबे भूमिहीन होती. १५,३३० कुटुंबांना जमिनी होत्या. संस्थानातील २,७९,४४९ एकर जमीन लागवडीसाठी योग्य होती. १५,००० कुटुंबामध्ये वरील जमिनीची वाटणी केली तर १८ ते १९ एकर जमीन प्रत्येक कुटुंबाच्या वाटयास येत होती. एकूण १९,३०१ खातेदार होते आणि प्रत्येक कुटुंबास १.२५ इतका जमीन महसूल द्यावा लागत होता. संस्थानात एकरपेक्षा कमी जमीन असणारी ८,७२० कुटुंबे होती. ६,६१० कुटुंबांना १८ एकरापेक्षा जास्त जमीन होती. ५० एकरापेक्षा जास्त जमीन असणाऱ्या कुटुंबाची संख्या ७४४ होती. तर १ एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या कुटुंबांची संख्या १,८६८ इतकी होती. म्हणजे ही कुटुंबे जवळ जवळ भूमिहीनच होती, असे म्हणावे लागते. अशा निराधार कुटुंबांची परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. त्यांना आपल्या अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा देखील भागविता येत नव्हत्या.[२६]

परंतु असे असले तरी बाळासाहेबांनी अनेक उपाय योजून आपल्या संस्थानातील लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला हे नाकारता येत नाही.

---

## संदर्भ व तळटीपा


१) गौरव ग्रंथ मंडळ, औंध, श्री भवानराव गौरव ग्रंथ, भाग २, विभाग ४, पृ. १९.
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०, १९२१-२२, १९२९-३०, १९३९-४०, १९४३-४४.

२) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. १९,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०, १९२१-२२, १९४३-४४,
लोकसत्ताक औंध (धापेकर चौकशी समितीचा अहवाल)

३) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. १५१,
रोदरमुंड इंदिरा, दि औंध एक्सपेरिमेंट – ए गांधीयन ग्रासरूटस् डेमॉक्रसी, पृ. २९,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०.

४) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. १५३,
रोदरमुंड इंदिरा, उपरोक्त, पृ. ३०.

५) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. १५४,
रोदरमुंड इंदिरा, उपरोक्त, पृ. ३३.

६) गौरव ग्रंथ, उपरोक्त विभाग ४, पृ. २१,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०, १९२१-२२, १९२९-३०, १९३९-४०, १९४३-४४.

७) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. १५६-५७.

८) कित्ता, विभाग ४, पृ. १५१-१५७.

९) कित्ता, (परिशिष्ट) पृ. ६,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९३९-४०.

१०) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. १५९, (परिशिष्ट), पृ. २९,
लोकसत्ताक औंध, (चापेकर चौकशी समितीचा अहवाल)

११) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. २०, (परिशिष्ट नं.१) पृ. २८.

१२) कित्ता, विभाग ४, पृ. ६४-६६,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्ष १९०९-१०.

१३) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ६७-७७.

१४) कित्ता, विभाग ४, पृ. ७३-७४.

१५) पंत आप्पा, मुलखा वेगळा राजा, पृ. ४, गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४ पृ. ७७.

१६) रोदरमुंड इंदिरा, उपरोक्त, पृ. ३३,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्ष १९२१-२२, गौरव ग्रंथ, उपरोक्त विभाग ४, पृ. ७८-८३.

१७) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ७८-८३.
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्ष १९२१-२२.

१८) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ८३.

१९) लोकसत्ताक औंध (चापेकर चौकशी समितीचा अहवाल).

२०) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ६१,
रोदरमुंड इंदिरा, उपरोक्त, पृ. ३४,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्ष १९२९-३०.

२१) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ५९.

२२) औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्ष १९३९-४०.

२३) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ६४,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्ष १९३९-४०.

२४) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ६४,
औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९२१-२२, १९२९-३०, १९३९-४०, १९४३-४४.

२५) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ६४,
<u>औंध संस्थान प्रशासन अहवाल</u>, वर्षे १९०९-१०, १९२१-२२, १९२९-३०, १९३९-४०, १९४३-४४.

२६) <u>लोकसत्ताक औंध</u> (चाफेकर चौकशी समितीचा अहवाल). १५१